# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI
(Established by Government of Maharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4 Dated 27th Sept. 2011 State University Governed by Maharashtra University Act, 1994 )
## Office of the Director Students' Welfare

**Dr.I.S. Mohurley**
Director
Mobile: 7774027661, 9422893555

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: unigug.org/ gondwana.digitaluniversity.ac
Email : director.studentwelfaregug@ gmail.com


**पत्र क्र. No.GU/DSW/ 175/2015** **Dt: 05 / 11 /2015**

प्रति,

१. मा. प्राचार्य, नेवजाबाई हितकारीणी महाविद्यालय, ब्रम्हपूरी, जि. चंद्रपूर
२. मा. प्राचार्य, सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर
३. मा. प्राचार्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, ब्रम्हपूरी, जि. चंद्रपूर
४. मा. प्राचार्य, डॉ. आंबेडकर महाविद्यालय, चंद्रपूर
५. मा. प्राचार्य, शिवाजी महाविद्यालय, गडचिरोली
६. मा. प्राचार्य, श्री शिवाजी महाविद्यालय, राजूरा, जि. चंद्रपूर

**विषयः— राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेतर्फे ''राज्यशास्त्र व लोकप्रशासन'' या विषयांचा अभ्यास करणाऱ्या पदव्युत्तर विद्यार्थी व अधिव्याख्यातांसाठी ''संसदीय कार्यप्रणाली आणि प्रथा'' या विषयावरील अभ्यासवर्गात सहभाग घेण्याकरिता पदव्युत्तर विद्यार्थ्यांचे नामनिर्देशन करणेबाबत.**

संदर्भः— राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखा, मुंबईचे पत्र क्र. ४१९९७/मविस/जनसंपर्क/सीपीए दि. ४ नोव्हेंबर, २०१५.

महोदय,

उपरोक्त संदर्भाधीन विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिवेशन सोमवार दि. ०७/१२/२०१५ पासून नागपूर येथे सुरु होणार आहे. अधिवेशन कालावधीत राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेतर्फे **''राज्यशास्त्र व लोकप्रशासन''** या विषयांचा अभ्यास करणाऱ्या पदव्युत्तर विद्यार्थी व अधिव्याख्याते यांना संसदीय शासनप्रणाली व विविध पैलुंची तसेच सभागृहात प्रत्यक्षात चालणाऱ्या संसदीय कामकाजाची माहीती व्हावी या उद्देशाने **''संसदीय कार्यप्रणाली आणि प्रथा''** या विषयावर **सोमवार दि. ०७/१२ ते ११/१२/२०१५** या कालावधीत **नागपूर** येथे संसदीय अभ्यासवर्ग आयोजित करण्यात येणार आहे. या अभ्यासवर्गासाठी आपल्या विद्यापीठामार्फत एकुण **०६ पदव्युत्तर विद्यार्थी व १ अधिव्याख्याता** यांची नावे निश्चित करुन दि. १८ नोव्हेंबर, दु. ३.०० वाजेपर्यंत अवर सचिव (समिती) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन मुंबई यांना पाठवावयाची असल्यामुळे आपण आपल्या महाविद्यालयातील पदव्युत्तर **विद्यार्थी व प्राध्यापक यांची नावे, २ फोटो (पासपोर्ट साईज), मोबाईल क्र., इमेल, वर्ग, पत्ता यासह सोमवार दि. १६/११/२०१५ दु. ३.०० वाजेपर्यंत** संचालक विद्यार्थी कल्याण यांच कार्यालयात निवड करण्यासाठी तातडीने पाठवावे. **कोणत्याही विद्यार्थ्यांचा व अधिव्याख्यात्यांचा दुसऱ्यांदा समावेश करु नये.** सहा महाविद्यालयालयातील प्रत्येकी एका पदव्युत्तर विद्यार्थ्यांची निवड करण्यात येईल व कोणत्याही फक्त एकाच अधिव्याख्यात्यांची निवड करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

संसदीय अभ्यासक्रमाची वैशिष्टे व सुचना माहीती व कार्यवाहीस्तव संलग्न करण्यात आली आहे. करीता विहीत वेळेत विद्यार्थ्यांचे व अधिव्याख्यात्याचे नामनिर्देशन करावे.

धन्यवाद!

(डॉ. ईश्वर श्रा. मोहुर्ले)
संचालक विद्यार्थी कल्याण

संचालक
विद्यार्थी कल्याण विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**सहपत्रे:— वरीलप्रमाणे**

संसदीय अभ्यासवर्गाचा उद्देश हा जास्तीत जास्त विद्यार्थी व अधिव्याख्यात्यांना संसदीय कार्यप्रणालीची ओळख करुन देणे तसेच, सभागृहांच्या कामकाजाच्या अवलोकनाची संधी उपलब्ध करुन देणे हा आहे.

**संसदीय अभ्यासवर्गाची वैशिष्ट्ये/सूचना**

(१) या अभ्यासवर्गाचा कालावधी सर्वसाधारणपणे पाच दिवसांचा असेल.
(२) सर्व विद्यापीठांनी पत्रामध्ये आपला ई-मेल पत्ता लिहिणे अनिवार्य असून विद्यार्थी संख्येबाबत असलेल्या मर्यादेतच नावे पाठविणे आवश्यक आहे.
(३) अभ्यासवर्गासाठी अधिव्याख्याता व विद्यार्थी यांची नावे पाठवितांना त्यांचे भ्रमणध्वनी क्रमांकसुद्धा कळविणे आवश्यक आहे. जेणेकरुन त्यांचे समवेत संपर्क साधून नागपूर येथील वाहन, निवास इत्यादींबाबत व्यवस्था करणे सोयीचे होईल.
(४) अभ्यासवर्गासाठी निश्चित केलेले अधिव्याख्याते व विद्यार्थ्यांची अचूक नावे *(सर्व नावे मराठीतच कळविण्यात यावीत)* व त्यांची पासपोर्ट आकारातील दोन रंगीत छायाचित्रे *(छायाचित्राच्या मागे संबंधितांचे नाव लिहिणे आवश्यक आहे.)* पाठविण्यात यावीत.
(५) अभ्यासवर्गाचे उद्घाटन झाल्यानंतर एकत्रित छायाचित्र घेण्यात येईल.
(६) दर दिवशी संसदीय कार्य प्रणालीशी संबंधित महत्त्वाच्या विषयांवर मान्यवर वक्त्यांची भाषणे व नंतर प्रश्नोत्तरे.
(७) दुपारच्या सत्रात विधानमंडळ सदस्यांसोबत अनौपचारिक चर्चा.
(८) विधानसभा/विधानपरिषद सभागृहांतील प्रत्यक्ष कामकाजाचे अवलोकन.
(९) नागपूर विद्यापीठाव्यतिरिक्त इतर विद्यापीठांतील अधिव्याख्याते व विद्यार्थी यांची अभ्यासवर्ग कालावधीत निवास व्यवस्था सीपीए, महाराष्ट्र शाखेद्वारे करण्यांत येईल.
(१०) अभ्यासवर्गासाठी उपस्थित असलेल्या सर्व विद्यापीठांच्या सर्व अधिव्याख्यात्यांना व विद्यार्थ्यांना ₹ ३००/- याप्रमाणे दैनिक भत्ता देण्यात येईल.
(११) **नागपूर विद्यापीठाव्यतिरिक्त इतर विद्यापीठांतील अधिव्याख्याते व विद्यार्थी यांना नागपूर येथे येण्या-जाण्याकरिता रेल्वेचे द्वितीय वर्गाचे प्रवास भाडे देण्यात येईल.**
(१२) नागपूर विद्यापीठाचे अधिव्याख्याते व विद्यार्थी यांना अभ्यासवर्गाचे कालावधीकरिता एकूण प्रत्येकी ₹ ६००/- (निश्चित दराने) याप्रमाणे प्रवास भत्ता देण्यात येईल.
(१३) **अधिव्याख्यातांना / विद्यार्थ्यांना रेल्वेचे कोणत्याही वातानुकुलीत वर्गाचे अथवा बसच्या स्लीपर कोचचे प्रवास भाडे देण्यात येणार नाही.**
(१४) संपूर्ण अभ्यासवर्गात सहभागी होणारे अधिव्याख्याते व विद्यार्थी यांनाच प्रमाणपत्र देण्यात येईल.
(१५) **प्रस्तावित संसदीय अभ्यासवर्गात दुस-यांदा सहभागी होणारे अधिव्याख्याते व विद्यार्थी यांचा सहभाग आपोआपच रद्द समजण्यात येईल व त्यांना कोणत्याही प्रकारचा दैनिक भत्ता / प्रवास भाडे / प्रमाणपत्र देय असणार नाही.**
(१६) **सर्व सहभागी अधिव्याख्याते व विद्यार्थी यांनी रविवार, दिनांक ०६ डिसेंबर, २०१५ रोजी नागपूर येथे पोहोचणे आवश्यक आहे. तसेच शुक्रवार, दिनांक ११ डिसेंबर, २०१५ रोजी (दुपारी ३.०० नंतर) निर्गमनाचा दिवस राहील. सर्व सहभागी अधिव्याख्याते व विद्यार्थी यांनी या सचिवालयाकडून कळविलेल्या दिनांकास नागपूर येथे पोहोचणे आवश्यक आहे.**

अतः **यापूर्वी ज्या अधिव्याख्यात्यांनी व विद्यार्थ्यांनी या अभ्यासवर्गाचा लाभ घेतलेला नाही फक्त अशाच अधिव्याख्यात्यांची व विद्यार्थ्यांची नांवे अभ्यासवर्गासाठी सुचविण्यात यावीत.** तसेच उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे विद्यापीठांच्या कार्यक्षेत्रातील जिल्हा व तालुकास्तरीय विद्यार्थ्यांचाही त्यात समावेश करावा.

अधिव्याख्याते/विद्यार्थ्यांची नावे तसेच प्रवासाचा तपशील इत्यादी बाबी **बुधवार, दिनांक १८ नोव्हेंबर, २०१५ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत** अवर सचिव (समिती), कक्ष क्रमांक ८०४, (८ वा मजला) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई-४०० ०३२ या पत्त्यावर तसेच **फॅक्स क्रमांक : ०२२-२२८२० ८२०** वर **तातडीने** पाठविण्यांत याव्यात.

विहित केलेल्या मुदतीनंतर म्हणजेच बुधवार, दिनांक १८ नोव्हेंबर, २०१५ रोजी नंतर प्राप्त झालेल्या **नावांचा कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही**, याची कृपया सर्व विद्यापीठांनी नोंद घ्यावी ही विनंती.

आपला,
(सही) ०४/११/१५
( सुनिल झोरे )
अवर सचिव (समिती),
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**श्री. सुनिल झोरे,** अवर सचिव (समिती), म.वि.स. - भ्रमणध्वनी क्र. ९८६९ ५३४ ९२३
**ई-मेल पत्ता** :- mls_mumbai@rediffmail.com / sunil_szore@rediffmail.com

D:\CPA NAGPUR 45th CLASS 2015\LETTERS-university.doc